शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra
DIRECTORATE OF EDUCATION
(Secondary & Higher Secondary)
Maharashtra State
Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doehighersec@gmail.com

**परिपत्रक-2**

**क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2020/**
**दिनांक-14/07/2020**

**प्रति,**

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर**

**विषय- इ.11वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.2020-21 कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ-** 1.संचालनालयाचे परिपत्रक क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2020/1501 दि.30/06/2020.
2.संचालनालयाचे पत्र क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2020/1520 दि.10/07/2020.
3.राज्यस्तर इ.11वी प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.12/07/2020.

संदर्भिय क्र.1 व 2 चे पत्रांनुसार राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.11वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पद्धतीने राबविणेबाबत संभाव्य वेळापत्रक व सविस्तर कार्यपद्धती विशद करण्यात आलेली आहे.

कोरोना विषाणू अर्थात कावीड-19 चा प्रादूर्भाव कमी करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मुंबई, पुणे तसेच राज्यातील इतर काही भागांमध्ये पुन्हा लॉकडाऊन/टाळेबंदी जाहीर करणेत आलेली आहे. तसेच मार्गदर्शन केंद्र तसेच माध्यमिक शाळांना, विद्यार्थी व पालक यांना सविस्त प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी अडचणी येऊ नयेत, आवश्यक कागदपत्रे मिळविता यावीत यासाठी यापूर्वी जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकामध्ये अंशत: बदल करुन सुधारित वेळापत्रक याद्वारे जाहीर करणेत येत आहे. (सोबत प्रत)

**पुणे,**
**दिनांक-14/07/2020**

**(दिनकर पाटील)**
**शिक्षण संचालक**
माध्यमिक व उच्च माध्यमिक

प्रत, कार्यवाहीस्तव,

**तलिस्मा कॉर्पोरेशन प्रा.लि. बेंगलुरु, कर्नाटक**

२/- सदर वेळापत्रकाप्रमाणे संकेतस्थळावर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**इ.11वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया 2020-21**

## सुधारित वेळापत्रक

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्र)

| क्र | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | कार्यवाही |
|---|---|---|---|
| 1 | उच्च् माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे. | **दिनांक-22 जुलै, 2020 पर्यंत** | **मुख्याध्यापक/प्राचार्य, शाळा/कमवि** |
| 2 | उच्च माध्यमिक शाळा/ कमविं नी भरलेली माहिती तपासून ऑनलाईन प्रमाणित/व्हेरिफाय करणे. | **दिनांक-24 जुलै, 2020 पर्यंत** | **विभागीय शिक्षण उपसंचालक** |
| 3 | इ.11वी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे, अर्ज भाग-1 भरणे व आर्जातील माहिती प्रमाणित करणेसाठी शाळा/ मार्गदर्शन केंद निवडणे आणि आपला अर्ज व्हेरीफाईड झाला आहे याची खात्री करणे. | **दिनांक- 26 जुलै, 2020 पासून सुरु** | **विद्यार्थी स्वतः, पालकांचे मदतीने** |
| 4 | विद्यार्थी प्रवेश अर्जातील माहिती, भाग-1 ऑनलाईन तपासून व्हेरीफाय करणे. (आवश्यकता असल्यास विद्यार्थ्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधणे.) | **दिनांक-27 जुलै, 2020 पासून** | **संबंधित शाळा /मार्गदर्शन केंद्र.** |
| 5 | विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग-2 (प्रवेशासाठी पसंतीक्रम) नोंदविणे व सबमिट/लॉक करणे. (नवीन अर्ज भाग-1 सुद्धा भरता येईल) | **महाराष्ट्र राज्य मंडळ- इ.10वी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झालेनंतर घोषीत करण्यात येईल.** | **विद्यार्थी स्वतः, पालकांचे मदतीने** |
| | | | |
| स रा व | **विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचा सराव करणेसाठी तात्पुरते प्रारुप संकेतस्थळ सुविधा देण्यात येत आहे, त्यामध्ये भरलेली माहिती दि.24 जुलै नंतर नष्ट करण्यात येईल.** | **दिनांक- 16 जुलै, 2020 पासून दिनांक- 24 जुलै, 2020 पर्यंत. (केवळ सरावासाठी) संकेतस्थळावर Mock.Demo.Registration तपासा** | **प्रत्यक्ष अर्ज भरण्यासाठी नंतर नव्याने नोंदणी करावी लागेल.** |

**विद्यार्थ्यांसाठी अर्ज भ्रण्याचा सराव करणेसाठी विशेष सुविधा-**

विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना अडचणींना सामोरे जावे लागू नये, त्यांना अर्ज भरण्याचा सराव करता यावा, मूळ अर्ज भरतांना चुका होऊ नयेत. यासाठी दरम्यानच्या कालावधीत संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी प्रारुप लॉगीन सुविधा देण्यात येत आहे. सदर सुविधेद्वारे विद्यार्थ्यांनी अर्ज भरणेचा सराव करावा. प्रत्यक्षात अर्ज भरण्यास सुरुवात होणेपूर्वी सदर भरलेली माहिती नष्ट करुन मूळ संकेतस्थळावर नव्याने अर्ज भरण्याची सुविधा त्यांना देण्यात येईल.

**विद्यार्थ्यांसाठी मूळ संकेतस्थळावर प्रत्यक्ष अर्ज भरणेची सुविधा दि.26/07/2020 पासून सुरु होईल.**

यापुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक यथवकाश जाहीर करणेत येईल.

**पुणे,**
**दिनांक-14/07/2020**

**(दिनकर पाटील)**
**शिक्षण संचालक**
माध्यमिक व उच्च माध्यमिक